माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /१७२ /२०२५ /पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| विजय कुरतडकर | जन माहिती अधिकारी, सहाय्यक धर्मादाय आयुक्त पुणे | प्रथम अपिलीय अधिकारी, सहाय्यक धर्मादाय आयुक्त पुणे |

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.१०.०१.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २५.१०.२०२४ | रामनगर कॉलनी मंडळ ,नोंदणी नंबर F-412 आपल्या कार्यालयाकडे नोंदणीकृत असून सदर नोंदणीकृत ट्रस्टचे ट्रस्टी व सभासद या व्यक्तींची नावे, मानधन व इतर तसेच सभासदांकडून घेत आलेली मासिक/वार्षिक वर्गणी रक्कमेची माहिती मिळावी. |

अपिलार्थी यांनी दि. ११.०३.२०२५ रोजी अर्ज करून आयोगास असे कळविले आहे की, प्रस्तुत प्रकरणात मागणी केलेली माहिती मिळाली असलेने सदरचे अपिल निकाली काढण्यात यावे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपिलार्थीच्या विनंतीवरुन सदरचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ पुणे.**

जावक क्र.रामाआ / १७२ /२०२५ /पुणे 8284/2025 दिनांक - 6/6/2025

रामाआ-पुणे/२०२३/NSB